मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महायुतीच्या श्रीरंग बारणेंचं शक्ती प्रदर्शन

## श्रीरंग बारणेंचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

आकुर्डी खंडोबा माळ येथून भव्य मिरवणुकीने जोरदार शक्तीप्रदर्शन करीत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (सोमवारी) उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, या निवडणुकीत आपण 2019 मधील आपलाच मताधिक्याचा विक्रम मोडून निवडून येऊ, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्याकडे खासदार बारणे यांनी उमेदवारी अर्ज सादर केला. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, भाजपचे विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री बाळा भेगडे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, अमर साबळे, आमदार प्रशांत ठाकूर, अण्णा बनसोडे, सुनील शेळके, अश्विनी जगताप, उमा खापरे, महेश बालदी, भाजपचे क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे, रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे आदी उपस्थित होते.

आकुर्डी खंडोबा माळ येथे श्री खंडेरायाचे आशीर्वाद घेऊन खासदार बारणे यांच्या मिरवणुकीस प्रारंभ झाला. ढोल ताशांचा दणदणाट, भगव्या टोप्या, फेटे, भगवे झेंडे, धनुष्यबाण चिन्ह, महायुतीतील पक्षांचे झेंडे घेऊन लोकसभा मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो कार्यकर्ते मिरवणुकीत सहभागी झाले होते. मिरवणुकीतील महिलांची संख्या देखील लक्षणीय होती. 'अब की बार, चार सौ पार', 'फिर एक बार, मोदी सरकार', 'महायुतीचा विजय असो', 'आप्पा बारणे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'होणार होणार, हॅटट्रिक होणार' या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

सकाळी साडेदहा वाजता सुरू झालेल्या या मिरवणुकीत खासदार बारणे विजय रथावर आरूढ झाले होते. सुरुवातीला काही काळ छोटा नातू राजवीर यालाही त्यांनी कडेवर घेतले होते.



### परिवाराकडून सदिच्छा

» उमेदवारी अर्ज दाखल करायला निघण्यापूर्वी थेरगाव येथील निवासस्थानी खासदार बारणे यांना पत्नी सरिता, बहिण रुक्मिणी कस्पटे, अश्विनी जाधव, सुना स्नेहा प्रताप बारणे, नीता महेश बारणे, कावेरी नीलेश बारणे यांनी औक्षण करून निवडणुकीतील विजयासाठी शुभेच्छा दिल्या. त्यावेळी खासदार बारणे यांचे पुत्र प्रताप व विश्वजीत, मेहुणे व राष्ट्रवादीचे नेते प्रकाश म्हस्के तसेच परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

" उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर खासदार बारणे यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. या निवडणुकीत आपण 2019 मधील आपलाच मताधिक्याचा विक्रम मोडून निवडून येऊ, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला. मावळ लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघात महायुतीचे आमदार आहेत. नरेंद्र मोदी हेच पुन्हा पंतप्रधान व्हावेत, अशी देशातील नागरिकांची भावना आहे. त्यामुळे या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने आपण विजयी होऊ.

- श्रीरंग बारणे

# पिस्तूल व जिवंत काडतुसासह तरुणाला वाकड पोलिसांकडून अटक

## पिस्तूल व जिवंत काडतुसासह एका 20 वर्षीय तरुणाला अटक : थेरगाव येथे वाकड पोलिसांची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिस्तूल व जिवंत काडतुसासह एका २० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई रविवारी (दि.२१) थेरगाव येथे वाकड पोलिसांनी केली आहे. बॉन्ड उर्फ रोहित राहूल शिंदे (वय २० रा. रहाटणी) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई अजय फल्ले यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा त्याच्याकडे अवैधरित्या २५ हजार रुपयांचे पिस्तूल व २ हजार रुपयांचे जिवंत काडतुस असा एकूण २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. यावरून वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विठ्ठल साळुंखे, पोलीस उपनिरिक्षक सचिन चव्हाण, अनिरुध्द सावर्डे, बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, सहायक पोलीस फौजळार राजेंद्र काळे, पोलीस हवालदार वंदु गिरे, अतिश जाधव, अतिक शेख, विक्रांत चव्हाण, पोलीस नाईक प्रशांत गिलबीले, रामचंद्र तळपे, पोलीस शिपाई विनायक घार्गे, अजय फल्ले, सौदागर लामतुरे, कौंतेय खराडे, रमेश खेडकर, ज्ञानदेव झेंडे यांनी मिळुन केली आहे.



# 'बारामती'साठी खडकवासल्यात मोर्चेबांधणी

## महायुतीचा फौजफाटा सात दिवस राखीव ठेवा : उपमुख्यमंत्री अजित पवारांची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

मताधिक्य वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला आणि बारामती लोकसभा मतदारसंघातील शहरी भाग असलेल्या खडकवासला विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. एक ते सात मे हा कालावधी केवळ बारामतीसाठी राखीव ठेवावा, अशी सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना केली आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मोठ्या गृहसंकुलांची माहिती महायुतीकडून संकलित करण्यात आली असून येथील समस्या सोडविल्या जातील, असा 'शब्द' नागरिकांना द्या, असेही पवार यांनी सुचविल्यामुळे बारामतीसाठी खडकवासल्यात मोर्चेबांधणी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत येत असलेल्या बारामती, दौंड, इंदापूर, पुरंदर, भोर याबरोबरच खडकवासला विधानसभा मतदारसंघ येतो. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील बहुतांश भाग शहरी असून शहरी भागातून भाजपला गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत मतदान झाले आहे. त्यामुळे यावेळी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना येथून किमान एक लाखांचे मताधिक्य मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यादृष्टीने खडकवासल्यात मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.



महायुतीचे खडकवासल्यातील निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन रविवारी झाले. त्यावेळी अजित पवार यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना त्याबाबतची स्पष्ट सूचना केली. बारामती लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या खडकवासला परिसरात १२६४ च्या आसपास गृहसंकुले आहेत. यातील काही सोसायट्यांमध्ये पाच-पाच हजार सदनिका आहेत. त्यादृष्टीने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराचे नियोजन आणि आखणी करावी. रस्ते, वाहतूक कोंडी, पाणी प्रश्न अशा सुटणाऱ्या समस्या या भागात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत चर्चा करून या समस्या तातडीने मार्गी लावल्या जातील. त्यामुळे प्रचाराला जाताना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी तसा 'शब्द' नागरिकांना द्यावा, असे पवार यांनी यावेळी सांगितले. घड्याळ या चिन्हाला मतदान म्हणजे महायुतीला मतदान हे मतदारांपर्यंत पोहोचवून सोसायट्यांतील मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी घ्यावी, असे पवार यांनी स्पष्ट केले.

महायुतीचे जिल्ह्यात चार उमेदवार आहेत. मात्र पहिली निवडणूक बारामतीसाठी होणार आहे. त्यामुळे प्रचारातही खडकवासल्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी बारामती लोकसभा निवडणुकीलाच प्राधान्य द्यावे. प्रचाराचे सातत्य टिकविण्यासाठी एक ते सात मे हा कालावधी केवळ बारामतीसाठी राखीव ठेवावा. त्यानंतर पुणे, शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघाच्या प्रचाराचे नियोजन करावे, अशी सूचना पवार यांनी केली.

# 'हरित हायड्रोजन धोरणा'बाबत पालिकेकडून मागवला अहवाल

## 'महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-2023' ची कार्यपद्धती ठरविण्याची प्रक्रिया सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यामध्ये राबविल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३' ची कार्यपद्धती ठरविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धोरणांतर्गत विविध महापालिका आणि नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रात हे प्रकल्प उभे केले जाणार आहेत. या प्रकल्पांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे धोरणाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा सुचविण्यात याव्यात असे राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना कळविले आहे. त्याअनुषंगाने पुणे महापालिकेकडून देखील स्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला असून तसेक आदेश राज्य शासनाने दिले आहेत.




### महापालिकेकडून देखील ग्रीन हायड्रोजनची निर्मिती

» पुणे महापालिकेने प्रायोगिक तत्त्वावर १० टन 'हायड्रोजन'ची निर्मिती करण्याचा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. प्रायोगिक तत्त्वावर तयार होणारा 'हायड्रोजन' पीएमपी बससाठी इंधन म्हणून वापरला जाणार आहे. पुणे महापालिका, वेरियट पुणे वेस्ट टू एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड आणि द ग्रीन बिलियन्स लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून रामटेकडी येथील महापालिकेच्या जागेत भारतातील पहिला हायड्रोजन गॅस निर्मिती प्रकल्प उभारला जाणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने हा प्रकल्प उभारण्यास परवानगी दिली आहे. शिवाय निरी, मुंबईच्या आयआयएम यांसारख्या संस्थांनी देखील सकारात्मक अहवाल दिले आहेत. यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात देखील तरतूद करण्यात आलेली आहे. पुणे महापालिका ४३० कोटी रुपये खर्चून शहरात हा प्रकल्प उभारणार आहे.

राज्यामध्ये हरित हायड्रोजन आणि त्याची तत्सम उत्पादने निर्मित केली जाणार आहेत. या उत्पादनांचा वापर नांगरोकानणी करावा याकरिता देखील धोरण आखण्यात आले आहे. राज्याला या उत्पादनांची बाजारपेठ बनविणे. हरित हायड्रोजनच्या वापरासाठी नवीन क्षेत्रे खुली करण्यास मदत करणे, संशोधन आणि विकास व तांत्रिक भागीदारीद्वारे या क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देणे आणि हरित इंधनाची निर्यात सुलभ करणे याकरीता असे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणांतर्गत कार्यपद्धती (प्रकल्प नोंदणी) तयार करण्यात आली आहे. यामध्ये नगर विकास विभागांतर्गत महानगरपालिका आणि नगर परिषदांकडून मान्यता व परवानगीची आवश्यकता असते.

यामध्ये ग्रीन हायड्रोजन उत्पादनासाठी कंपन्यांना जमीन संपादन करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांकडून (आवश्यक असल्यास) परवानगी घेणे, प्रकल्पासाठी पाण्याच्या उपलब्धतेबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांची परवानगी मिळवणे, बिल्डिंग प्लॅनची मंजुरी (प्लॅन मंजुरीसह, तात्पुरती फायर एनओसी, तात्पुरते पाणी कनेक्शन, ड्रेनेज प्लॅन मंजूरी) घेणे यांचा समावेश आहे. तसेच, स्थानिक संस्थेकडून बांधकाम प्रमाणपत्र घेणे, इमारत पूर्णत्व आणि भोगवटा प्रमाणपत्र मिळवणे, अग्निशमन विभागाकडून एनओसी घेणे आवश्यक करण्यात आलेले आहे. शासनाचा हरित हायड्रोजन प्रकल्प आस्थापित करण्यासाठी व हरित हायड्रोजनच्या उत्पादनास प्रोत्साहन देण्याकरिता या धोरणांतर्गत कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यंतर्गत प्रकल्प नोंदणी अन्वये नगर विकास विभागांतर्गत संबंधित मान्यता/परवानगी/नोंदणी तातडीने मिळण्याणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सद्यस्थितीत असलेली कार्यपध्दती, मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदी पूरेशा नसल्यास त्यामध्ये करावयाच्या सुधारणांबाबत स्वयंस्पष्ट मत, अभिप्राय आवश्यक त्या कागदपत्रासह शासनाला व संचालनालयाला सादर करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत.

# मतदार जागृतीसाठी भित्तीपत्रक प्रदर्शन

## प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते

**पिंपरी | प्रतिनिधी**

अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीचा संदेश देण्यासाठी रेखाटलेल्या भित्तीपत्रक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आले. युवकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी व्हावे आणि इतरांनाही मतदान (PUNE) करण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन यावेळी डॉ.पुलकुंडवार यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालय व भारतीय कला प्रसारिणी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे, भारतीय कला प्रसारिणीचे पृथ्वीराज पाठक, प्राचार्य राहूल बळवंत उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशातील नागरिकांना मताधिकार मिळाल्याने मतदानाचा दिवस हा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होता यावे व पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. मतदानावेळी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना घरातून मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नागरिकांनीदेखील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करावा. समाजामध्ये बदल घडविण्याची ताकद तरुण पिढीमध्ये असून नवमतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.पुलकुंडवार यांनी कलेच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकाला मतदानाचे आवाहन करणारे संदेश दिल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्या मनात निश्चितपणे मतदान करण्याची भावना निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. दिवसे म्हणाले, कला हे प्रभावी माध्यम असल्याने कलेच्या माध्यमातून जास्तीत जास्त ना गरिकांपर्यंत प्र भावीपणे संदेश पोहोचविता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलली भित्तीपत्रके मतदारजागृतीसाठी उपयुक्त ठरतील. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या चित्रांतून मतदानाचा संदेश अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचेल. अन्य माध्यमांचा उपयोग करून ही कलाकृती विविध शासकीय कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविधउपक्रमात सहभागी व्हावे प्रत्येक पात्र मतदाराने येत्या 13 मे रोजी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले. मतदानाचीटक्केवारी वाढावी यासाठी प्रशासनाकडून स्वीप उपक्रमांतर्गत विविधउपक्रम राबविण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

### विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव

» स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे यांनी मतदान जनजागृतीसाठी स्वीप मार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच भारतीय कला प्रसारणीचे श्री. पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी तसेच विद्यार्थी- विद्यार्थीनी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भित्तीपत्रके तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

# पाण्याचे बिल 111 कोटी, सांडपाण्याचा दंड 93 कोटी

## महापालिका भरते पिण्याच्या पाण्यापेक्षा सांडपाण्याचा दंडच भरमसाठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणेकरांना पुरवठा करण्यासाठी महापालिका खडकवासला धरणातून पाणी घेते. या पाण्याच्या शुल्कापोटी जलसंपदा विभागाने महापालिकेकडे जुलै २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या आठ महिन्यांसाठी ११० कोटी ८८ लाख रुपयांच्या बिलाची मागणी केली आहे. मात्र, धक्कादायक म्हणजे शहरात तयार होणारे सांडपाणी महापालिका शुद्ध न करता थेट नदीत सोडते. या पाण्यावर तब्बल ९२ कोटी ४१ लाख रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे. त्यामुळे महापालिकेस पिण्याच्या पाण्यापेक्षा सांडपाण्याचा दंडच भरमसाठ भरावा लागत आहे.



जलसंपदा विभागाकडून महापालिकेस सांडपाण्यासाठी २०१६ पासून दंडाची आकारण्यात आली आहे. शहरात दैनंदिन ८३५ एमएलडी सांडपाणी तयार होते. त्यातील सुमारे ४३८ एमएलडी पाण्यावर महापालिका प्रक्रिया करून ते पाणी पुन्हा मुठा नदीत सोडते. मात्र, उर्वरित पाण्यासाठी महापालिकेस या दंडाची आकारणी करण्यात येत आहे.

जलसंपदा विभागाने महापालिकेस शहराच्या पाण्यासाठी २०१६ पासून ७४८ कोटी रुपयांच्या पाण्याच्या शुल्काची आकारणी केली असून, त्यावर तब्बल ४४८ कोटींचा दंड आकारत महापालिकेस १,१९६ कोटी रूपयांचे थकीत बिल पाठवले आहे. त्यातील महापालिकेने आतापर्यंत ८५९ कोटींची रक्कम भरली आहे. उर्वरित ३३८ कोटी आणि २०१४ पूर्वीची १४० कोटी अशी ४७८ कोटींच्या निधीची मागणी आता महापालिकेकडे करण्यात आली आहे. जायका प्रकल्प प्रकल्प होत असतानाच महापालिकेची हद्दवाढ होत असल्याने पुन्हा नवीन सांडपाण्याची समस्या निर्माण होत आहे.

### जॅकवेलचा खर्च पाण्यात

» सांडपाणी शुद्ध करून ते नदीत सोडायचे. तसेच वर्षाला साडेसहा टीएमसी शुद्ध केलेले पाणी शेतीला द्यायचे, यासाठी महापालिकेने मुंढवा येथे १८० कोटी रुपये खर्चून जॅकवेल बांधला आहे. मात्र, जॅकवेलचे पाणी चांगले नसल्याचे कारण देत जलसंपदा विभागाने ठरलेल्या निर्णयानुसार शेतीसाठी पाणी घेतले जात नाही. परिणामी, महापालिकेस सांडपाणी शुद्ध करण्यासाठी वर्षाला जवळपास ५०० कोटींचा खर्च करूनही पुन्हा १०० कोटी दंडासाठी मोजावे लागत आहेत.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस मार्गावर बदल

## बदलाचा पालन न केल्यास भुर्दंड : घाट क्षेत्रामध्ये वेगळी वेग मर्यादा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरुन हजारोंच्या संख्येने वाहन जात असतात. या मार्गावर शनिवार अन् रविवारी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. सुट्टीच्या दिवशी वाहनांची संख्या वाढल्यामुळे वाहतूक कोंडी होत असते. आता या मार्गावर वेग मर्यादा बदलण्यात आली आहे. घाट क्षेत्रामध्ये वेग मर्यादा वेगळी करण्यात आली आहे. या बदलाची अधिसूचना वाहतून शाखेचे अप्पर पोलीस महासंचालक सुखविंदर सिंह यांनी काढली आहे. यामुळे मुंबई – पुणे एक्सप्रेस वे वरून प्रवास करताना सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी या वाहतूक वेग मर्यदिचे पालन करणे अनिवार्य आहे.



पुणे मुंबई द्रुतगती मार्गावर किलोमीटर क्रमांक ३५.५०० ते किमी ५२.०० हा भाग घाट क्षेत्र आहे. तसेच उर्वरित भाग समतल भाग आहे. घाटक्षेत्रासाठी वाहनांसाठी असणारी वेगमर्यादा बदलण्यात आली आहे. बोरघाट आणि उर्वरित मार्गावर ही वेगमर्यादा वेगवेगळी करण्यात आली आहे. जी प्रवासी वाहनाने चालकासह आठ प्रवासी वाहतूक करतात त्यांना एम एक श्रेणी दिली गेली आहे. या वाहनांसाठी घाटातील वेगमर्यादा 60 किलोमीटर तर उर्वरित मार्गावर 100 किलोमीटर प्रतितास करण्यात आली आहे.

पुणे-मुंबई महामार्गावर वेग मर्यादा निश्चित केली आहे. या मर्यदिचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना दंड आकरण्यात येणार आहे. महामार्गावर लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून हा दंड होणार आहे. एक्स्प्रेस वे वर सर्वत्र गॅन्टी उभारण्यात आले आहे. त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहे. आता संपूर्ण एक्स्प्रेस वे सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत आला आहे. यामुळे वेग मर्यदिचे उल्लंघन न करता वाहन धारकांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे..

वेग मर्यादाचे उल्लंघन केल्यास दंड पुणे-मुंबई महामार्गावर वेग मर्यादा निश्चित केली आहे. या मर्यदिचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना दंड आकरण्यात येणार आहे. महामार्गावर लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून हा दंड होणार आहे. एक्स्प्रेस वे वर स र्वत्र गॅन्टी उभारण्यात आले आहे. त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहे. आता संपूर्ण एक्स्प्रेस वे सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत आला आहे. यामुळे वेग मर्यदिचे उल्लंघन न करता वाहन धारकांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अशी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली

» प्रवासी वाहनांमधून चालकासह नऊ आणि त्यापेक्षा अधिक प्रवासी वाहतूक केली जाते, ती वाहने एम दोन व एम तीन या श्रेणीत येतात. या वाहनांसाठी घाट भागात 40 किलोमीटर तर इतर भागात 80 किलोमीटर प्रतितास अशी मर्यादा ठरवण्यात आली आहे. तसेच मालवाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी घाट क्षेत्रात 40 किलोमीटर तर इतर भागात 80 किलोमीटर प्रतितास अशी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

# भीमेचे पात्र कोरडे ; नदीकाठच्या गावांत पाणीटंचाई

## पिण्याच्या पाण्याबरोबरच पिकांनाही फटका : उजनी धरणाच्या पाणीपातळीत कमालीची घट

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सोलापूरसह अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदान असलेल्या उजनी धरणाच्या (यशवंत सागर) पाणीपातळीत कमालीची घट झाली असून परिणामी, इंदापूर तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांना पाणीटंचाई जाणवत आहे. भीमा नदीपात्र कोरडे पडल्याने नदीकाठच्या शेतपिकांनाही फटका बसणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.



या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. परतीचा पाऊस काहीसा समाधानकारक झाल्यामुळे उजनी धरण प्लसमध्ये आले होते. परंतु, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी धरणात ६० टक्क्यांपर्यंतच उपयुक्त पाणीसाठा झाला होता. त्यामुळे धरणासोबत भीमा नदीच्या पाण्याने तळ गाठला आहे. एप्रिल, मे महिने प्रचंड पाणीटंचाई जाणवणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

उजनी धरण हे दौंड, इंदापूर, श्रीगोंदा, कर्जत, माढा व करमाळा या तालुक्यांच्या नदीकाठच्या गावांना वरदान ठरले आहे. उजनी धरणाच्या बॅक वॉटरमधील पाण्यामुळे सिंचनाखाली असणारे क्षेत्र वाढवून हा भाग सुजलाम सुफलाम झाला. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता आली. परंतु, या वर्षी या भागात पाऊस समाधानकारक न झाल्याने उजनी धरण पूर्णक्षमतेने भरलेच नाही. त्याचा परिणाम ऐन उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाईच्या झळा तीव्र होणार असल्याचे जाणवू लागले आहे.

भीमा नदीची सध्याची पाण्याची परिस्थिती पाहता नदीपात्र कोरडे पडले आहे. इंदापूर तालुक्यातील भाटनिमगाव, भांडगाव, अवसरी बेडसिंगे, बाभुळगाव, वडापुरी सुरवड, वकील वस्ती या भीमा नदी पात्रावर अवलंबून असणाऱ्या गावांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे जनावरांच्या पिण्याचे पाणी तसेच चाऱ्यासाठी उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पाणी सोडण्याची मागणी होत आहे.

### वीज मोटार चोरीचे प्रमाण वाढले

भीमा नदी पात्रात पाणीटंचाई निर्माण झाल्याने पाणी उपसा करणाऱ्या विद्युत मोटर बंद असल्याने मोठ्या प्रमाणात चोरीचे प्रमाण वाढले आहे. नदीपात्रात पाणी नसल्याने विद्युत मोटर व साहित्य चोरीचे प्रमाण वाढल्याने शेतकरी प्रचंड चिंतेत आहे.

कायमस्वरूपी तोडगा म्हणून भीमा नदी पात्रात जर दोन बुडीत बंधारे झाले तर उन्हाळ्यातही विहिरींना पाणी राहून विहिरींची पाण्याची पातळी कायम राहील व या योजनेचा फायदा सर्व गावांना होईल. या पूर्वीही धरणांतर्गत बुडीत बंधारे व्हावे यासाठी मोर्चे आंदोलने झाली परंतु अजूनही त्याची कोणी दखल घेतलेली नाही.

### नदीपात्रात पाणी सोडण्यासाठी प्रयत्न हवेत

» सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू असून नेतेमंडळी सभा व कार्यक्रमांमध्ये व्यस्त आहेत. सत्ताधारी पक्षातील आमदार दत्तात्रय भरणे व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत.